स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.

सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत
अर्थशास्त्र या विषयात पीएच.डी. पदवीकरिता
सादर करावयाचा प्राथमिक संशोधन आराखडा

मराठवाड्यातील लिंगायत समाजाचे आर्थिक व सामाजिक अध्ययन
(सन २००१ ते २०११)

- संशोधकाचे नाव -

प्रा. चिलर्गे बालाजी वसंतराव

(एम.ए.एम.फिल. अर्थशास्त्र)

(अर्थशास्त्र विभाग प्रमुख)

महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड

ता.मुखेड जि.नांदेड

- मार्गदर्शकाचे नाव -

डॉ. घाटे पी.आर.

(एम.ए.पीएच.डी. अर्थशास्त्र)

प्राचार्य, बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय, उमरी

ता. उमरी जि.नांदेड

मार्च - २०१६

प्रस्तावना :

_____भारतात २९ घटकराज्य व ७ केंद्रशासीत प्रदेश आहेत. महाराष्ट्र हे फुले शाहू व आंबेडकरांसोबत महात्मा बसवेश्वरांच्या पूरोगामी विचारांचा वारसा लाभलेले एक प्रगतशिल राज्य आहे. भारताच्या आर्थिक राजधानीचे मुख्य शहर मुंबई हे महाराष्ट्राच्या राजधानीचे शहर आहे. महाराष्ट्राची प्रदेशवार विभागणी कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ अशी केली जाते. महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक स्थितीला भक्कम करण्यात या सर्व प्रदेशांचे योगदान आहे.

भारतासह महाराष्ट्राच्या समाज व्यवस्थेमध्ये जाती संस्था हे एक महत्वपूर्ण लक्षण आहे. जाती व्यवस्थेनुसारच महाराष्ट्रातील सामाजिक, आर्थिक , राजकीय, सांस्कृतीक व इतर घटकांचे स्वरुप ठरत असते. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत इतर घटकांसोबत जाती व्यवस्था हा एक महत्वाचा घटक आहे. त्यामुळेच महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास करतांना जातींच्या अभ्यासाला प्राधान्य दिले जाते. म्हणून या संशोधनामध्ये लिंगायत समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करुन त्यांचे महाराष्ट्राच्या विकासातील योगदान तपासणे महत्वाचे आहे.

महाराष्ट्रात कमी-अधिक संख्येने विविध समाजाचे लोक राहतात. आदिवासी, ग्रामीण, शहरी, विकसित व विकसनशील असे या समाजाचे स्वरुप आहे. हिंदू, मुस्लीम, बौध्द, मराठा, धनगर, कोमटी, लिंगायत, पारधी , मांग, हटकर, वंजारी इ. नावाने महाराष्ट्रातील जाती समुहास ओळखले जाते. प्रत्येक समाजाचे वेगळेपण आहे. प्रत्येकाच्या निर्मीतीचा व जडणघडणीचा स्वतंत्र इतिहास आहे. या प्रत्येक समाजाच्या सद्यस्थिती व समस्यांत वेगळेपणा जाणवतो.

लिंगायत हा एक प्रमुख समाज आहे. जो संपुर्ण भारतभर विखुरला आहे. विशेषतः कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तेलंगणा, केरळ, तामिळनाडू इ. राज्यात त्याचे प्रमाण बऱ्यापैकी आहे. कर्नाटक हे लिंगायत समाजाच्या उदयाचे केंद्र स्थान आहे. परंतू कर्नाटकाच्या सीमावर्ती भागात मग तो महाराष्ट्र, आंध्रप्रदेश किंवा तेलंगणाचा असो तेथे लिंगायताचे अधिक प्रमाण आहे.

संपुर्ण महाराष्ट्रात जवळपास ९० लाख लोकसंख्या लिंगायतांची आहे. लिंगायत पोटजाती गृहित धरल्यातर हा आकडा वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. महाराष्ट्रातील एकूण ३६ जिल्ह्यापैकी सोलापूर जिल्ह्यात लिंगायतांची संख्या सवाधिक आहे. त्या खालोखाल मराठवाडा विभागात लिंगायताचे प्रमाण महाराष्ट्राच्या इतर विभागाच्या तुलनेत अधिक आहे. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यात हा समाज कमी अधिक संख्येने दिसून येतो. लिंगायत समाजाचे नेतृत्वस्थान असलेल्या शिवराज पाटील चाकूरकर, दिलीप सोपल, बस्वराज पाटील मुरुमकर, खा. चंद्रकांत खैरे, गंगाधर पटणे, जयदत्त क्षिरसागर इत्यादी मराठवाड्यातील लिंगायत लोकप्रतिनिधींनी महाराष्ट्राच्या विधीमंडळात मराठवाड्यातील लिंगायत समाजाच्या व एकूण मराठवाड्याच्या हितार्थ अनेक कार्य केले. परंतू या सर्वाकडे आजपर्यंत संशोधनाच्या दृष्टीने पाहण्याचे कार्य मात्र झालेले आढळत नाही. जवळपास महाराष्ट्रातील एकूण लिंगायताच्या लोकसंख्येपैकी अर्धी लोकसंख्या मराठवाड्यात आहे. तरीही या समाजाच्या सामाजिक आर्थिक प्रश्न व स्थितीच्या संदर्भात आजपर्यत संशोधन झालेले नाही. किंबहूना ते व्हावे म्हणून लिंगायत समाजाच्या सामाजिक, आर्थिक स्थिती व समस्यांना जाणून घेण्याच्या उद्देशाने फारसे प्रयत्न झ ाल्याचे आढळत नाही.

प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातुन मराठवाड्यातील लिंगायत समाजाची सामाजिक व आर्थिक जडणघडणीचा अभ्यास करण्याच्या हेतुनेच **“मराठवाड्यातील लिंगायत समाजाचे आर्थिक व सामाजिक अध्ययन”** हा विषय संशोधनासाठी निवडला गेला आहे.

संशोधनाची समस्या :

अर्थशास्त्र या गतिशील सामाजिक विद्याशाखेत संशोधनासाठी बरेच विषय उपलब्ध आहेत. अलिकडील काळात सामाजिक शास्त्रातील संशोधनात नाविन्यता असावी या विचाराची मांडणी अनेक सामाजिक शास्त्रज्ञाकडुन होत आहे. तसेच एखाद्या विषयावर संशोधन केल्याचे आत्मिक, सामाजिक व वैचारिक समाधान संशोधकाला मिळणे गरजेचे आहे. संशोधनातील वारंवारता टाळण्याच्या हेतुने मी आजपर्यंत आपल्या विद्यापीठाच्या अर्थशास्त्र या सामाजिक विद्याशाखेअंतर्गत संशोधन न

झालेल्या विषयाचा शोध घेवून माझे संशोधन मार्गदर्शक डॉ.घाटे पी.आर. यांच्या सोबत विषय निवडीबाबत चर्चा केली आणि संबंधित विषयाच्या अनुषंगाने संशोधनासाठी पुढील समस्या निश्चित करण्यात आली. `मराठवाड्यातील लिंगायत समाजासमोरील असलेल्या विविध सामाजिक व आर्थिक समस्येचे अध्ययन करणे.`

संशोधनाचे हेतू :

आपल्या विद्यापीठात अर्थशास्त्र या विषयात आजपर्यंत लिंगायत समाजाच्या आर्थिक व सामाजिक अभ्यास करण्याच्या हेतुने संशोधन न झाल्याचे माझ्या निदर्शनास आले म्हणुन हा विषय निवडला हा संशोधनाचा हेतू आहे.

महाराष्ट्राच्या समाज व अर्थकारणातील बदल हा समाज व जातीच्या अभ्यासाशिवाय पुर्ण होवू शकत नाही. कारण प्रत्येक राज्याच्या समाज व अर्थकारणात प्रत्येक समाजाची भुमिका महत्वाची असते. प्रत्येक समाज राज्याचे अर्थकारण विकसीत व प्रगतीच्या दिशेने नेण्यासाठी हातभर लावत असतो. लिंगायत समाज ही त्यास अपवाद नाही. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आणि लिंगायत समाज याचे घनिष्ठ नातेसंबंध आहे. या नातेसंबंधाची उकल व्हावी त्यामुळेच मराठवाड्यातील लिंगायत समाजाच्या आर्थिक अभ्यासाची निवड केली.

मराठवाड्यात अधिक लोकसंख्या असणाऱ्या जिल्ह्यात लिंगायतात सामाजिक श्रेष्ठत्व असणाऱ्या जातींची आर्थिक स्थिती चांगली आहे. या उलट कमी लोकसंख्या असणाऱ्या जिल्ह्यात व इतर पोट जातीची आर्थिक स्थिती खालावली आहे. असे का झाले ? या प्रश्नाचे उत्तर संशोधनाच्या पायऱ्यातुन शोधावे म्हणून हा विषय निवडला.

सर्वसाधारणपणे लिंगायत समाजाविषयी लिंगायततेत्तर समाज चर्चा करताना श्रीमंत असणारा समाज असे उद्‌गार काढतो. या उद्‌गारात किती सत्यता आहे. ते तपासण्याच्या उद्देशाने हा विषय निवडला.

मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यातील लिंगायतात असणाऱ्या सामाजिक जाणिवा, रुढी - परंपरा, ईश्वर, गुरु, मठ इ. विषयीची मत मतांतरे वेगवेगळी जाणवतात. त्याचेही सखोल चिंतन व्हावे म्हणून हा विषय निवडला.

लिंगायत समाजाचे व्यापारविषयक विचार, नौकऱ्यातील प्रमाण, शिक्षणाविषयीची जाण, धर्मक्षेत्र या सर्वांचा अर्थव्यवस्थेशी असलेला संबंध स्पष्ट करण्याच्या जाणिवेतून या विषयाची निवड केली.

<u>संशोधनाचा आढावा किंवा पार्श्वभुमी :</u>

"मराठवाड्यातील लिंगायत समाजाचे सामाजिक - आर्थिक अध्ययन"या विषयावर संशोधनास प्रारंभ करताना या विषयावर अगोदर झालेल्या संशोधनाचा आढावा घेणे संशोधक म्हणून कर्तव्य आहे. या कर्तव्य भावनेतून मी त्या संदर्भात विविध विद्यापीठ अभ्यासक, संशोधन केंद्र या ठिकाणी विचारपुस व तपासणी केली असता मला खालील माहिती मिळाली.

संपूर्ण महाराष्ट्रात अर्थशास्त्रीय दृष्टीने लिंगायत समाजाचा अभ्यास झाला नाही.

१) डॉ. किर्तनकार राजेश्वर विश्वाथ यांनी डॉ.जी.बी. गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली, डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठातुन "नांदेड जिल्ह्यातील जंगम समाजाचे आर्थिक व सामाजिक अध्ययन" या विषयावर संशोधन करुन पीएच.डी. पदवी मिळवली.

डॉ.किर्तनकार यांचा अभ्यास लिंगायत समाजाचे गुरु म्हणून ओळखले जाणाऱ्या जंगम समाजापुरताच मर्यादित आहे. तसेच त्याची व्याप्ती नांदेड जिल्ह्यापुरती मर्यादीत आहे.

२) डॉ.डोंगे सतिष बाबुराव संत जनाबाई महाविद्यालय गंगाखेड यांनी आपल्याच विद्यापीठातून "लातूर जिल्ह्यातील मराठा आणि लिंगायत समाजाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा चिकित्सक आभ्यास" या विषयावर पीएच.डी. मिळवली.

त्यांचा हा अभ्यास तुलनात्मक असून लातूर जिल्ह्यापुरताच मर्यादित आहे.

३) देगलूर महाविद्यालय देगलूर येथील प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव यांना विद्यापीठ अनुदान आयोगा नवी दिल्लीमार्फत महाराष्ट्रातील लिंगायत समाजाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थिती आणि समस्यांचा अभ्यास या विषयावर बृहद संशोधन प्रकल्प (Majar Research Project) मंजूर झाला आहे. तो पूर्ण झाला नाही. त्यांच्या विषयाची व्याप्ती संपूर्ण महाराष्ट्रातील लिंगायत समाजाच्या सर्वांगीण स्थिती व समस्येशी संबंधीत आहे

४) डॉ.सुर्यकांत घुगरे यांनी वीरशैव व इतर धर्म आणि समाज या पुस्तकात साधारणपणे बऱ्याच वर्षापुर्वी संपुर्ण भारतातील वीरशैव (लिंगायत) समाजाचा समाजाशास्त्रीय दृष्ट्या अभ्यास केला.

वरील सर्व पूर्व संशोधनाचा गाभा, विषय, व्याप्ती आणि माझ्या विषयाचा आशय व व्याप्तीत वेगळेपणा आहे. प्रत्येक समाज हा गतीशील असतो. या गतिशीलतेचा प्रभाव त्यांच्या जडणघडणी व संस्कारावर होतो. मराठवाड्यातील लिंगायताच्या संदर्भाने माझे होणारे संशोधन पहिलेच आहे. ज्यात मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातील लिंगायत समाज शहरी व ग्रामीण भागातील लिंगायत समाजाचा अभ्यास होणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

१) मराठवाड्यातील लिंगायत समाजाच्या सामाजिक - आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

२) मराठवाड्यातील लिंगायत समाजाच्या सामाजिक इतिहासाशी संबंधीत असलेल्या कांही घटनावर प्रकाश टाकणे.

३) मराठवाड्यातील लिंगायत समाजाच्या आर्थिक परिस्थितीवर प्रभाव टाकणाऱ्या कारणांचा शोध घेणे.

४) मराठवाड्याच्या आर्थिक स्थितीमध्ये महत्वाचे योगदान बजावणाऱ्या लिंगायत समाजबांधवांचा अभ्यास करणे.

५) मराठवाड्यातील लिंगायत मठांचे लिंगायतांच्या सामाजिक -आर्थिक जीवनातील योगदान तपासणे.

६) मराठवाड्यातील लिंगायत समाजाची उदनिर्वाहाच्या साधनातील विविधता जाणून घेणे.

गृहितके :-

संशोधनातील गृहितकांचे अनन्य साधारण महत्व आहे.कोणत्याही संशोधनाचा प्रारंभ करतांना संशोधकास कांही गृहितके प्रमाण मानावी लागतात. त्याशिवाय संशोधन एका विशिष्ट साचे बंद पध्दतीने जात नाही. गृहितके ही संशोधनाची दिशा निश्चित करतात. त्यामुळेच संशोधकांने खालील गृहितकांना प्रमाण मानले आहे.

१)	मराठवाड्यातील लिंगायत समाजात सामाजिक एकवाक्यतेचा अभाव आहे.

२)	मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यापैकी बहुल प्रमाणात लोकसंख्या असणाऱ्या जिल्ह्यातील लिंगायत समाज आर्थिकदृष्ट्या सक्षम वाटतो.

३)	मराठवाड्यातील लिंगायत समाज हा साधी रहाणी, कष्टाळू व धर्मनिरपेक्ष वृत्तीचा आहे.

४)	लिंगायत समाजाचे व्यवसायातील योगदान कमी झाले आहे.

५)	मराठवाड्यातील लिंगायत समाज बांधवाच्या आर्थिक विकासाला चालना देण्यात समाजधुरणांना व शासनाला अपेक्षित यश आले नाही.

६)	लिंगायत समाजाच्या आर्थिक विकासासाठी शासकीय पातळीवरील फारसे प्रयत्न झाले नाहीत.

संशोधनाचे महत्व :-

प्रस्तुत विषयाला अनेक अंगाने व अर्थाने अत्यंत महत्व आहे. वास्तविकपणे संशोधनात प्रत्येक बाबीला महत्व असतेच म्हणून मराठवाड्यातील लिंगायत समाजाचे सामाजिक व आर्थिक चित्र स्पष्ट करण्याच्या दृष्टीने हे संशोधन कार्य सर्वांना मार्गदर्शक ठरेल किंबहूना प्रस्तुत संशोधन हे मराठवाड्यातील लिंगायत समाजाचे सामाजिक आणि आर्थिक योगदान देणाऱ्या व्यक्तीवर प्रकाश

झोत टाकण्याच्या दृष्टीनेसुध्दा महत्वाचे आहे. तसेच मराठवाड्यातील विविध आर्थिक व सहकारी चळवळीच्या विकासातील लिंगायताचे योगदान व त्यांची भुमिका स्पष्ट करणारी आहे. एव्हाना वर्तमान नव भांडवली व्यवस्थेत लिंगायत समाजाच्या तत्वज्ञानाची प्रस्तुतता तपासण्याच्या दृष्टीने संबंधित विषयाचे महत्व नाकारता येत नाही. सबब प्रस्तुत संशोधन हे मराठवाड्यातील लिंगायत समाजाच्या सामाजिक व आर्थिक समस्यांवर समग्र दृष्टीने विचार करुन त्यावर विविध उपाययोजना करण्याच्या दृष्टीने शासनास उपयुक्त ठरेल अशी आपेक्षा करायला हरकत नाही. विशेषतः मराठवाड्यातील लिंगायत समाजाच्या आर्थिक स्थिती विषयीच्या अनभिज्ञ मुद्यांना प्रकाशात आणण्याच्या दृष्टीने हे संशोधन कार्य उपयुक्त व अत्यंत महत्वाचे ठरेल.

संशोधन अभ्यास पध्दती :-

प्रस्तुत संशोधनामध्ये `मराठवाड्यातील लिंगायत समाजाचे सामाजिक व आर्थिक अध्ययन` या विषयावर संशोधनाचे कार्य करीत असताना मराठवाड्यातील लिंगायत समाजाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीबाबत आभ्यास करीत असताना प्राथमिक व दुय्यम संशोधन पध्दतीचा आधार घेऊन माहिती संग्रहन केली आहे.

मराठवाड्यात एकूण आठ जिल्हे असून या अंतर्गत एकूण ७६ तालुके आहेत या प्रति तालुकाअंतर्गत येणाऱ्या एकूण गावापैकी आठ गावे निवडण्यात येतील आणि प्रत्येक गावातुन एक कूटूंब अभ्यासासाठी निवडले जाईल.

नमुना निवड करत असताना संभाव्यता नमुना निवड पध्दतीतील साधा साद्रच्छिक (Simple random sampling) नमुना निवड पध्दतीचा अंवलबन करुन या अंतर्गत लॉटरी नमुना निवड पध्दतीच्या मार्गे संशोधनासाठी ६०८ लिंगायत कुटूंबाची नमुना म्हणुन आम्ही निवड करणार आहोत.

तथ्य संकलन :-

कोणत्याही विषयावरील संशोधनाची यशस्वीता तथ्य संकलन करण्याच्या विश्वासार्हतेवर अवलंबुन असते. तथ्य संकलन प्राथमिक व दुय्यम साधन सामुग्रीच्या साहाय्याने होते.

प्राथमिक साधन सामुग्रीत प्रस्तुत संशोधनात Correlation analysis, Regression analysis, $x^२$, t आणि Coefficient of variation या संख्याशास्त्रीय पध्दतीचा आवलंब केला आहे. तसेच प्रत्यक्ष मुलाखती, विविध स्थळांना भेटी, सर्वेक्षण, निरीक्षण, अनुसूची या साह्याने पूर्ण होणार आहे. त्याशिवाय विविध अभ्यासकांनी केलेले लिखान, नियतकालीके व वर्तमानपत्रातील आलेल्या बातम्यांचा आधार घेवून तथ्य संकलन केल्या जाईल. तसेच मराठवाड्यातील लिंगायत समाजाशी संबंधित विविध घटना, घडामोडी, प्रसंग व समाकालीन परिस्थिती हा तथ्य संकलनातील महत्वाचा भाग आहे. तरीही संबंधित संशोधनात प्रलेखीय स्त्रेताच्या आधारे संशोधनाचे कार्य केले जाईल.

दुय्यम साधनसामुग्रीत लिंगायत समाजाशी संबंधीत ऐतिहासीक लिखान, शिलालेख, ताम्रपट, दस्ताऐवज, शासकीय गॅझेटिअर, शासनाचा अहवाल व शासन प्रकाशित पुस्तकांची मदत घेतली जाईल.

<u>संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-</u>

सामाजिक शास्त्राअंतर्गत संशोधन करतांना विषयाला वस्तूनिष्ठ व नि:पक्ष स्वरुप यावे यासाठी संधोधन समस्येची व्याप्ती अधोरेखित करणे, संशोधनाच्या दृष्टीने महत्वाचे असते. भारत व महाराष्ट्रात लिंगायत समाजाने आपल्या कार्य व कर्तृत्वाचा ठसा अनेक क्षेत्रात उमटवला आहे. परंतू संबंधित संशोधनामध्ये फक्त मराठवाड्यातील लिंगायतांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचाच अभ्यास करण्यावर सामाजिक शास्त्राअंतर्गत संशोधन करतांना विषयाला वस्तूनिष्ठ व नि:पक्ष स्वरुप यावे यासाठी संधोधन समस्येची व्याप्ती अधोरेखित करणे, संशोधनाच्या दृष्टीने महत्वाचे असते. भारत व महाराष्ट्रात लिंगायत समाजाने आपल्या कार्य व कर्तृत्वाचा ठसा अनेक क्षेत्रात उमटवला आहे. परंतू संबंधित संशोधनामध्ये फक्त मराठवाड्यातील लिंगायतांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचाच अभ्यास करण्यावर भर देण्यात येणार आहे.

लिंगायत समाज मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणिक कोकणात आहे. परंतू या अभ्यासामध्ये मात्र फक्त मराठवाड्यातील लिंगायत समाजाचा अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच मराठवाड्यातील लिंगायत समाज तसेच इतर प्रदेशातील लिंगायत समाज यांचा तुलनात्मक अभ्यास केला जाणार नाही याची संशोधकाने प्रकरणाची व्याप्ती लक्षात घेवून त्यावर मर्यादा घातली आहे. तसेच मराठवाड्यात अनेक प्रभावशाली जाती समुह व समाज संस्था आहेत. त्यांचेही मराठवाड्याच्या समाज व अर्थ कारणात योगदान आहे. त्यासर्वांची विशिष्ट अशी सामाजिक स्थिती व आर्थिक जडणघडण आहे. तरीही या संशोधन कार्यामध्ये मराठवाड्यातील लिंगायत समाजाची इतर समाजाशी कोणत्याही प्रकारची तुलना करण्याचे प्रयोजन नाही.

संशोधनाची यशस्वीता व उपयुक्तता सिध्द होण्याच्या दृष्टीने त्याची मर्यादा निश्चीत ठरविणे आवश्यक आहे. प्रस्तुत संशोधनाचा विषय हा मराठवाड्यातील लिंगायत समाजाच्या

सामाजिक व आर्थिक स्थितीशीच संबंधीत आहे. म्हणून येथे होणारे संशोधन लिंगायत समाजाच्या सामाजिक व आर्थिकतेच्या अभ्यासालाच प्राधान्य देणारे असेल. तसेच प्रस्तूत विषयाच्या मांडणीला व्यापकता व परिपूर्णता येण्याच्या दृष्टीने गरजेनूसार इतर घटकांचा समावेश करण्यात येईल.

संशोधन आराखडा निहाय्य प्रकरणाची माहिती :

अ.क्र.	**संशोधन प्रकारणाचे नाव**
१)	प्रस्तावना
२)	संशोधन साहित्याचा आढावा.
३)	लिंगायत समाजीची पार्श्वभुमी / रुपरेखा
४)	मराठवाडा आणि लिंगायत समाज
५)	मराठवाड्यातील लिंगायतांचे सामाजीक क्षेत्र
६)	मराठवाड्यातील लिंगायत समाजाची आर्थिक स्थिती
७)	निष्कर्ष व शिफारशी

निवडक संदर्भ ग्रंथ सुची :-

३)	The Lingayat Movement A Social Relolution in Karbatak S.M.Hunshal Bansal

२)	वीरशैव व इतर धर्म आणि समाज डॉ.सुर्यकांत घुगरे

३)	वीरशैव विश्वकोश डॉ.सुधाकर मोगलेवार

४)	बसव स्थळे - प्रा.भीमराव पाटील

५)	हैद्राबाद मुक्ति संग्राम आणि स्वामी रामानंद तीर्थ - डॉ. सोमनाथ रोडे

६)	बसव पथ द्वैमासिक -बाळासाहेब पाटील

७)	महात्मा बसवण्णा, चरित्र, त्यांची तत्वे आणि समाज - प्रा.भीमराव पाटील.

८)	हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम - अनंत भालेराव

९)	मराठवाडा : काल आणि आज - प्रा.भगवान काळे

१०)	मी, मराठवाडा आणि महाराष्ट्र : भुजंगराव कुलकर्णी

११)	क्रांतीकारी महात्मा बसवेश्वर - डॉ. मेनकुदळे अशोक

१) संशोधन पध्दती - डॉ. आगलावे प्रदिप

२) संशोधन पध्दती - डॉ. कायंदे पाटील गंगाधर